सीए सीए २२०६१०
**आरबीआय/२००९-१०/५०३**
**डीपीएस.सीओ. सीएचडी क्र. २८०६/०४.०७.०५/२००९-१०** **जून २२,२०१०**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक / मुख्यकार्यकारी अधिकारी
सर्व अधिसूचित वाणिज्य बँका - आरआरबीसह/
नागरी सहकारी बँका / राज्य सहकारी बँका/
जिल्हा केंद्रीय सहकारी बँका

महोदया/महोदय,

**चेक्सच्या फॉर्मवरील प्रमाणीकरण व सुरक्षा लक्षणात वाढ**

आमच्या ह्या विषयावरील परिपत्रक डीपीएसएस. सीओ. सीएचडी. क्र. १८३२/०४.०७.०५/२००९-१० दि. फेब्रु २२, २०१० कडे आणि त्याच्या जोडपत्रामधील “ चेकवरील बदल / सुधारणा ह्यावर मनाई ” वरील परिच्छेद १.८ कडे आपले लक्ष वेधण्यात येते आहे.

बँका तसेच जनतेकडून आमच्याकडे, ह्याबाबतची कायदेशीर वैधता, अंमलबजावणीची लागु होणारी तारीख इत्यादींबाबत स्पष्टीकरण मागणारे संदर्भ येत आहेत. आम्ही येथे स्पष्ट करू इच्छितो की “ चेक्सवरील बदल/सुधारणा” ह्याबाबत विहित केलेल्या बाबी -

१) चेक्स फॉर्मचे प्रमाणीकरण व त्यामधील सुरक्षा लक्षणात वाढ करण्याबाबतची गरज ह्यावरील खास स्थापन केलेल्या कार्यकारी गटाच्या शिफारशींच्या आधारावर आणि बँकाचा सल्ला घेतल्यावर तयार करण्यात आल्या आहेत.

२) निरनिराळ्या क्षेत्रातील चेक्सवरील खोडाखोड / बदल केल्याने होणाऱ्या लबाड्या टाळण्यासाठी आणि बँका व ग्राहक ह्यांना सुरक्षा देण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत

३) ह्या बाबी, केवळ इमेज-बेस्ड चेक ट्रंकेशन सिस्टिम खाली (सीटीएस) वाटण्यात येणाऱ्या चेक्ससाठीच लागु आहेत. चेक्स गोळा करणाऱ्या बँकांनी, असे चेक्स सीटीएममध्ये स्वीकारले जाणार नाहीत ह्याची सुरूवाती पासूनच काळजी घ्यावी.

४) ह्यय बाबी, एफआयसीआर समाशोधन, नॉन - एमआयसीआर समाशोधन, ओव्हर दि काउंटर गोळा करणे (रोख रक्कम देण्यासाठी) ह्यासारख्या इतर समाशोधन व्यवस्थांना किंवा समाशोधन गृहाच्या व्यवस्थेबाहेरील चेक्स थेट गोळा करण्याबाबत लागु नाहीत.

५) ह्या बाबी, पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स अधिनियम, २००७ खाली भारतीय रिझर्व बँकेला दिलेल्या वैधानिक अधिकाराचा वापर करून प्रसृत करण्यात आल्या आहेत.

ही कार्यप्रणाली डिसेंबर १, २०१० पासून अंमलात येईल. बँकांना सागण्यात येते की, त्यांनी ह्याबाबत ग्राहकांना माहिती देऊन त्यांच्यामध्ये जाणीव निर्माण करावी. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीतपणे चालेल. संदर्भित परिपत्रकातील इतर मुद्यांबाबत, इंडियन बँक्स असोशिएशन/नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्यांचेकडून वेगळयाने कळविण्यात येईल.

आपला,

(अरुण पसरिचा)
महाव्यवस्थापक